02-03-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 03/01/2025 10:55 PM Page 1



सिकेरी टेकडी वाचवण्यासाठी लढा सुरूच ठेवणार
पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड



आफ्रिकेचा इंग्लंडवर सोपा विजय
पान ३ वर

वेर्णा, रविवार, २ मार्च २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 178 | Verna, | facebook.com/dainikherald | Sunday 2 March 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### व्यावसायिक सिलिंडर ६ रुपयांनी महागला

नवी दिल्ली, दि. १ : होळीच्या तोंडावर सरकारने सर्वसामान्यांना मोठा झटका दिला आहे. केंद्रीय अर्थसंकल्पानंतर एलपीजी गॅस सिलिंडरच्या किंमती पुन्हा वाढवण्यात आल्या आहेत. अर्थसंकल्पाच्या दिवशी सरकारने दिलेली सवलत आज मागे घेण्यात आली आहे. शनिवार, १ मार्च २०२५ रोजी, इंडियन ऑइलने १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या किंमतीत ६ रुपयांची वाढ केली आहे. तथापि, १४ किलोच्या घरगुती गॅस सिलिंडरच्या किमतीत कोणताही बदल झालेला नाही. दिल्लीत १९ किलोचा व्यावसायिक एलपीजी सिलिंडर १,८०३ रुपयांना उपलब्ध होईल, जो फेब्रुवारीमध्ये १,७९७ रुपयांना होता. त्याचप्रमाणे, कोलकातामध्ये व्यावसायिक सिलिंडरची किंमत १,९१३ रुपये झाली आहे, जी फेब्रुवारीमध्ये १,९०७ रुपये होती. तर मुंबईत १,७५५.५० रुपयांना उपलब्ध होईल. फेब्रुवारीमध्ये त्याची किंमत १,७४९.५० रुपये होती. चेन्नईमध्येही त्याची किंमत आता थोडी वाढून १,९१८ रुपये झाली आहे.

-----------

### छत्तीसगडमध्ये २ नक्षल्यांना कंठस्नान

छत्तीसगड, दि. १ : छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात जवानांनी दोन नक्षलवाद्यांना ठार मारले आहे. त्यापैकी एक महिला आणि एक पुरूष नक्षलवादी आहे. दोघांचेही मृतदेह सापडले आहेत, परंतु त्यांची ओळख पटलेली नाही. २०२५ मध्ये मारल्या गेलेल्या नक्षलवाद्यांसह ८३ नक्षलवादी मारले गेले आहेत. हे प्रकरण किस्ताराम पोलिस स्टेशन परिसरातील आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी सकाळपासून पोलिस आणि वरिष्ठ नक्षलवादी नेत्यांमध्ये चकमक सुरू आहे. दोन्ही बाजूंकडून अधूनमधून गोळीबार सुरू आहे. कोब्रा, डीआरजी आणि जिल्हा दलाच्या सुमारे ५०० सैनिकांनी किस्ताराम परिसरात नक्षलवाद्यांना घेराव घातल्याचे सांगण्यात येत आहे. याआधी ९ फेब्रुवारी रोजी सैनिकांनी विजापूरमध्ये ३१ नक्षलवाद्यांना ठार मारले होते. सर्व ३१ जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. या चकमकीत दोन जवानही शहीद झाले. ही चकमक विजापूरच्या इंद्रावती राष्ट्रीय उद्यान परिसरात घडली. या वर्षातील ही सर्वात मोठी नक्षलवादी कारवाई होती.

-----------------

### दिल्लीत जुन्या वाहनांना पेट्रोल-डिझेल बंद

नवी दिल्ली, दि. १ : दिल्लीत, १५ वर्षांपेक्षा जुन्या वाहनांना ३१ मार्चपासून पेट्रोल आणि डिझेल दिले जाणार नाही. दिल्लीतील वाढत्या वायू प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी दिल्ली सरकारने हे पाऊल उचलले आहे. दिल्लीचे पर्यावरण मंत्री मनजिंदर सिंग सिरसा म्हणाले, 'या निर्णयाची माहिती लवकरच केंद्रीय पेट्रोलियम मंत्रालयाला दिली जाईल. आम्ही पेट्रोल पंपांवर असे गॅझेट बसवत आहोत, जे १५ वर्षांपेक्षा जुने वाहन ओळखतील. अशा वाहनांना पेट्रोल आणि डिझेल दिले जाणार नाही. सिरसा म्हणाले की, दिल्ली सरकार वाहनांमधून होणारे उत्सर्जन आणि प्रदूषण रोखण्यासाठी कठोर पावले उचलत आहे. शहरातील सर्व उंच इमारती आणि हॉटेल्सवर अँटी-स्मॉग गन बसवणे सक्तीचे करण्यात आले आहे. सिरसा यांच्या मते, डिसेंबर २०२५ पर्यंत दिल्लीतील सुमारे ९० टक्के सार्वजनिक सीएनजी बसेस पद्धतशीरपणे काढून टाकल्या जातील. त्यांच्या जागी इलेक्ट्रिक बसेस चालवल्या जातील. जे स्वच्छ आणि शाश्वत सार्वजनिक वाहतुकीसाठी सर्वोत्तम आहेत.

**हवामान**

कमाल : ३३ किमान : २६
आर्द्रता : ६५

**बाजार भाव**

सोने : ₹ ८९,३०० (१० ग्रॅम)
चांदी : ₹१,००,१०० (१ किलो)

**शेअर मार्केट**

सेन्सेक्स : ७८,३६५ .७७↑ (३१.६४)
निफ्टी : २१,२३५.९० ↑ (३०.८४)

# काशिनाथ शेट्ये एक पाऊल पुढे

## अधिकाऱ्यांना धमकावल्याप्रकरणी चौघांविरोधात दिली तक्रार | धमक्यांना भीत नसल्याचा दिला इशारा

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. १ : आमदार संकल्प आमोणकर आणि वीज अभियंता काशिनाथ शेट्ये यांच्यातील हमरीतुमरीचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर शनिवारी शेट्ये यांनी पोलिस स्टेशन गाठले. सडा येथील वीज खात्याच्या मालमत्तेत प्रवेश करून कुंपण घालण्यास प्रतिबंध करत संबंधित अधिकाऱ्यांना धमकावल्यावरून चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करावा, अशी मागणी शेट्ये यांनी आज पणजी पोलिसांत तक्रार अर्ज देऊन केली. सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.**



**सरकारी कर्मचाऱ्यांची प्रतिमा आपण सुधारायला हवी. आम्ही सरकारी कर्मचारी असून लोकांना मदत करणे हे आमचे कर्तव्य आहे. आम्ही राजासारखे वागू नये, तर लोकांना मदतीचा हात द्यायला हवा. कुणी आमच्यावर अन्याय करत असेल, तर त्याविरोधात उभे राहायला हवे. मी कुणालाही भीत नाही. माझ्याकडे परवानाधारक दोन शस्त्रे आहेत. स्वत:चे रक्षण करायला मला ती वापरता येतात.**

**–काशिनाथ शेट्ये,**
**कार्यकारी अभियंता, वीज विभाग.**

या तक्रार अर्जात मुरगावचे आमदार संकल्प आमोणकर यांचे नाव शेट्ये यांनी नोंदवलेले नाही. सडा येथील वीज खात्याच्या जागेतून जवळच असलेल्या वस्तीत जाण्यासाठी कुंपण तोडून मार्ग केल्याप्रकरणी कारवाई करण्यासाठी शेट्ये व इतर अधिकारी काल त्या ठिकाणी गेले होते. शुक्रवारी सकाळी ८.३० वाजता बोगदा वीज विभागाच्या मालमत्तेवर घडलेल्या घटनेबाबत हा तक्रार अर्ज असल्याचे त्यांनी पणजीचे पोलिस निरीक्षक तसेच उत्तर गोवा पोलिस अधीक्षकांना उद्देशून लिहिलेल्या तक्रार अर्जात नमूद केले आहे. शून्य एफआयआर नोंदविण्यासाठी व त्यास मुरगाव पोलिस स्थानकात हस्तांतरित करण्यासाठी विनंती असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

ओंकार दुर्भाटकर, यश फडते आणि सुधीर तारी (पूर्वी बोगदा बारचे मालक, आता इतर कोणी चालवतो) आणि योगेश पाटील यांची नावे संशयित म्हणून अर्जात दिली आहेत. त्यांनी कार्यकारी अभियंता काशिनाथ शेट्ये यांना तसेच इतर अधिकाऱ्यांना त्यांच्या सार्वजनिक कर्तव्य पार पाडताना अडथळा निर्माण केला म्हणून टकलम २२१ नुसार गुन्हा नोंद करावा. या चौघांनी बोगदा वीज विभागाच्या जागेत बेकायदेशीरपणे अतिक्रमण केले व अधिकाऱ्यांना धमकावले. त्यांनी सरकारी अधिकाऱ्यांना अपमानित करून त्यांना मानसिक त्रास दिला. यामुळे कलम ३२९ नुसार गुन्हा नोंदवावा, अशी मागणी तक्रार अर्जात केली आहे. या चौघांनी अधिकारी काशिनाथ शेट्ये आणि इतर अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यात अडथळा आणला आणि त्यांच्या हालचाली रोखण्याचा प्रयत्न केला. यामुळे कलम १२६ नुसार आणि या चौघांनी दंगल घडवण्याच्या हेतूने चिथावणी दिली आणि वीज विभागाच्या संपत्तीला सुमारे दीड लाख रुपयांचे नुकसान केले म्हणून कलम १९२, ३२४ (५) नुसार गुन्हा नोंद करण्यात यावा. त्यांनी गुन्हेगारी कट रचल्याचे स्पष्ट होते म्हणून कलम ६१ नुसार गुन्हा नोंद करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे

तक्रार अर्ज दाखल केल्यानंतर माध्यमांशी बोलताना शेट्ये यांनी अधिक स्पष्ट केले की, शुक्रवारी वास्को येथे घडलेल्या घटनेत संबंधित भागात चार वाटा उपलब्ध आहेत आणि आम्ही लोकांना एक वाट देण्यास तयार आहोत. आम्हाला वाट देण्याबद्दल कोणतीही हरकत नाही. मात्र, त्यासाठी योग्य कायदेशीर प्रक्रिया पूर्ण व्हायला हवी. मला कोणतीही धमकी आमदारांनी दिलेली नाही. धमक्या तेथील स्थानिक लोकांनी दिल्या आहेत. ते कोणत्या 'भाई' ला फोन लावून बोलत होते, हे त्यांच्या फोनची तपासणी केल्यावरच

पान २ ▶

## मांद्रे हत्याप्रकरणी दीपन बत्राला न्यायालयीन कोठडी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १ :** जुनसवाडा मांद्रे येथे मेरी ऊर्फ मारिया फर्नांडिस यांच्यावर गाडी घालून हत्या केल्याच्या प्रकरणात दिल्लीतील पर्यटक दीपन राजू बत्रा याला १४ दिवस न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. दि. २० फेब्रुवारी रोजी मेरी फर्नांडिस या आपल्या घराजवळील रस्त्याच्या कोपऱ्यावर शहाळी विकत बसल्या होत्या. यावेळी संशयित दीपन राजू बत्रा याच्यासोबत त्यांच्यात अनेकदा वाद झाले होते. मेरी यांनी बत्रा याला त्याचा कुत्रा सार्वजनिक ठिकाणी आणून त्रास देऊ नये, अशी सूचना केली होती. मात्र, या वादाचे पर्यवसान भीषण गुन्ह्यात झाले. वादानंतर संतप्त झालेल्या बत्रा याने तुम्हाला पाच मिनिटांत दाखवतो! असे धमकीवजा वक्तव्य केले. त्यानंतर काही वेळातच आपल्या कारमध्ये आई-वडिलांसह परत येत, रस्त्यावर बसलेल्या मेरी फर्नांडिस यांच्यावर वाहन चढवले. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना फरफटत नेण्यात आले आणि जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर बत्रा थेट मांद्रे पोलिस ठाण्यात जाऊन संरक्षण घेण्यासाठी बसला.

मांद्रे पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल करत आरोपीला अटक केली. सुरुवातीला त्याला ५ दिवस पोलिस कोठडीत ठेवण्यात आले होते. त्यानंतर न्यायालयात हजर केल्यानंतर १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. या प्रकरणात मांद्रे पोलिसांकडून आरोपीला व्हीआयपी वागणूक दिली जात असल्याचा आरोप काही राजकीय नेत्यांनी केला आहे. पंचायत मंडळ आणि स्थानिक नागरिकांनी मेरी फर्नांडिस यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळेपर्यंत आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. या हत्याकांडावेळी बत्रा यांच्या गाडीत त्याचे आई-वडीलही उपस्थित होते. त्यामुळे त्यांनीही या गुन्ह्यात सहभाग घेतला का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी स्थानिक स्तरावरून करण्यात येत आहे.

मेरी फर्नांडिस आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह शहाळी विकून करत होत्या. त्यांचे दोन्ही मुलगे बेरोजगार असल्याने कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. त्यांच्या मदतीसाठी स्थानिक पंचसदस्य रॉबर्ट फर्नांडिस, माजी सरपंच प्रशांत ऊर्फ बाळा नाईक आणि पंचसदस्य किरण सावंत यांनी प्रत्येकी एक लाख रुपयांचा निधी जाहीर केला आहे. तसेच, आमदार जीत आरोलकर यांनी सरकारमार्फत शक्यती सर्व मदत मिळवून देण्याची हमी दिली आहे.

मांद्रे मतदारसंघात अशा प्रकारची घटना प्रथमच घडल्याने

पान २ ▶

## पणजीत पर्यटक टॅक्सी पार्किंगवर निर्बंध

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १:** स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत सुरू असलेल्या कामांमुळे उत्तर गोवा जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी राजधानी शहरात पर्यटक टॅक्सी पार्किंगवर निर्बंध लागू केले आहेत. अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी महादेव आरोंदेकर यांनी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, पर्यटक टॅक्सींना सामान्य सार्वजनिक पार्किंग लॉटमध्ये उभे करण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच, प्रवाशांना उतरवणे किंवा घेण्यासाठी तीन मिनिटांपेक्षा अधिक वेळ थांबण्यास परवानगी दिली जाणार नाही. स्मार्ट सिटीचे काम पूर्ण होईपर्यंत पर्यटक टॅक्सींना फक्त नियुक्त पार्किंग क्षेत्रांमध्येच उभे करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

शहरातील वाहतुकीचा सुरळीत प्रवाह कायम राखण्यासाठी अतिरिक्त जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी वाहतूक नियमनासाठी साइनबोर्ड लावण्यास परवानगी दिली आहे. दुसरीकडे पर्यटन हंगामात खासगी वाहनांचा रेंट-ए-कार स्वरूपात होत असलेला वाढता वापर लक्षात घेता, परिवहन संचालनालयाने अशा वाहनांवर कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. यासोबतच, पुढील आदेश येईपर्यंत रेंट-ए-कॅब योजनेंतर्गत कोणत्याही नव्या परवानग्या जारी न करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कडक दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. पहिल्या उल्लंघनासाठी १०,हजार रुपयांचा दंड, वाहनाची जप्ती आणि नोंदणी अथवा परवाना निलंबित करण्याचा समावेश असेल. पुनरावृत्ती झाल्यास वाहन जप्त करणे, दंड आकारणे आणि परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यासारखी कठोर कारवाई केली जाईल.

परिवहन संचालनालयाने स्पष्ट केले आहे की, रस्ता सुरक्षेच्या दृष्टीने आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. भाड्याने घेतलेल्या वाहनांमुळे रस्ते अपघातांमध्ये वाढ झाली असून, मद्यप्राशन करून वाहन चालवणे, निष्काळजीपणा आणि वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन या समस्यांमुळे नागरिकांचे जीव धोक्यात येत आहेत.

गोवा सिव्हिक अँड कंझ्युमर ॲक्शन नेटवर्क (गोवा कॅन) ने परिवहन संचालनालयाच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. रस्ते अपघातात विमा दावे आणि प्रवाशांच्या सुरक्षेसंदर्भात येणाऱ्या

पान २ ▶

## 'रेरा' कडून नियमभंग करणाऱ्या बिल्डरला ५ लाखांचा दंड

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १ :** गोवा रिअल इस्टेट रेग्युलेटरी अथॉरिटी (रेरा) ने पणजी येथील एका बांधकाम व्यावसायिकाला 'रेरा' कडे प्रकल्पाची नोंदणी न केल्याबद्दल ५ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. तसेच, तक्रारदार संस्था कोलवा सिविक अँड कंझ्युमर फोरमला १ लाख रुपये खर्च म्हणून द्यावेत, असा आदेश जारी करण्यात आला आहे. या संस्थेचे प्रतिनिधित्व अध्यक्षा ज्युडिथ आल्मेडा आणि सचिव शकुंतला मेस्किटा यांनी केले होते.

'रेरा' सदस्य विन्सेंट डिसिल्वा यांनी 'रेरा' कायद्याच्या कलम ५९ अंतर्गत हा आदेश दिला असून, टी. आर. कन्स्ट्रक्शन्सला आदेश निर्गमित झाल्यापासून ६० दिवसांच्या आत दंडाची रक्कम भरावी लागेल. अन्यथा, त्यांच्यावर पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल. सोनिया लेमोस, टोनी रॉड्रिग्ज आणि टी. आर. कन्स्ट्रक्शन्स यांना आदेश लागू झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत शपथपत्राच्या स्वरूपात अनुपालन अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अहवाल सादर न झाल्यास प्राधिकरण पुढील कायदेशीर कारवाई करणार आहे.

कोलवा गावातील वॉर्ड-१, सासष्टी येथे सर्वे क्रमांक ११९/२ या भूखंडावर एकूण १६,७२५ चौरस मीटर क्षेत्रफळाचा विकास दोन टप्प्यांत करण्यात आला. या प्रकल्पांतर्गत पाच भूखंड विकले गेले. मात्र, प्रकल्पाच्या ठिकाणी अनिवार्य सूचना फलक नसल्याचे आढळून आले. तसेच, नियोजित प्रवेश रस्त्याच्या रुंदीमध्ये मोठ्या तफावती आढळल्या. प्रस्तावित दक्षिण प्रवेश सहा मीटर रुंदीचा असावा, मात्र प्रत्यक्षात तो केवळ ३.५० मीटर होता. उत्तरेच्या बाजूने आवश्यक रुंदी १० मीटर असताना प्रत्यक्षात तो ४ मीटरच होता.

याशिवाय, नगर नियोजन (टीसीपी ) विभाग, मडगाव यांनी २० एप्रिल २०२३ रोजी नियमनाच्या उल्लंघनासह या प्लॉट विकास प्रकल्पास मान्यता दिली. यामुळे, रेरा कायद्याच्या नियमांचे सर्रास उल्लंघन झाल्याचे स्पष्ट झाले.

कोलवा ग्रामपंचायतीने १७ जुलै २०२३ रोजी या प्रकल्पाला तात्पुरता परवाना दिला, तर दक्षिण गोवा जिल्हाधिकाऱ्यांनी ६ जुलै २०२३ रोजी रूपांतरण सनद मंजूर केली. मात्र, प्रतिवादींनी आवश्यक त्या नियमानुसार 'रेरा' कडे प्रकल्पाची नोंदणी केली नव्हती. त्यामुळे, नियमभंगाच्या आधारे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. तक्रारदारांनी या प्रकरणी सर्व परवानग्या आणि मंजुरी रद्द करण्याची मागणी केली होती. तसेच, भू-भरणासाठी आणि रस्त्यांच्या विकासासाठी आवश्यक परवानगी न घेतल्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती. याशिवाय, प्रकल्पाच्या तपासणीमध्ये त्रुटी राहिल्यामुळे उपनगर नियोजक आणि कोलवा ग्रामपंचायतीवरही कठोर कारवाई करण्याचा आग्रह धरण्यात आला होता. दरम्यान, टोनी रॉड्रिग्ज आणि टी. आर . कन्स्ट्रक्शन्स यांनी त्यांच्या उत्तरात तक्रार अस्पष्ट आणि

पान २ ▶

## राज्यात व्हिवा कार्निव्हलला सुरुवात..!












'खा, प्या आणि आनंदी राहा,' या किंग मोमोच्या संदेशाने राजधानी पणजीत मोठ्या दिमाखात शनिवारी व्हिवा कार्निव्हलला सुरूवात झाली. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी या मिरवणुकीचा शुभारंभ केला. किंग मोमोची राजवट पुढील तीन दिवस राहणार आहे. रंगीबेरंगी आणि आकर्षित असे चित्ररथांची मिरवणूक पाहण्यासाठी प्रेक्षकांनी मोठी गर्दी केली होती. पणजी पाटो ते कांपाल मैदानपर्यंत कार्निव्हल मिरवणूक पार पडली. कार्निव्हलमध्ये कुटुंब, संस्था आणि स्वतंत्र पातळीवरही सहभाग घेतला. या वर्षीच्या कार्निव्हल थीममध्ये पर्यटन परंपरा, गोवा टीबी मुक्त करण्याचा संदेश आणि वारशाचा सन्मान करण्यावर भर देण्यात आला. मिरवणूक मुख्य मार्गाने सुरू असल्याने पणजीतील वाहतूक अंतर्गत रस्त्याने वळवण्यात आली होती. त्यामुळे काही प्रमाणात वाहतुकीची कोंडी झाली.

(छाया : उपेंद्र नाईक)